Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT Golden Research Thoughts

दलित चळवळ

प्रा. डॉ. राजेंद्र नामदेवराव मोरे ,
एम.ए., सेट., नेट .,एम.फिल.,पीएच.डी. संशोधक मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग,
संत रामदास महाविद्यालय ,घनसावंगी जि. जालना.

प्रस्तावना :-

सहा डिसेंबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. आंबेडकर आकस्मित निधन हा दलित चळवळीला फार मोठा आघात होता. या घटनेमुळे अस्पृश्य विरोधी जातीअंताच्या लढ्याची एका पर्वाची समाप्ती झाली. बाबासाहेबांच्या वैचारिक अधिष्ठात अंतर्भूत असलेल्या 'समग्र सामाजिक क्रांतीच्या' वाटचालीचा एक टप्पा परिपूर्ण झाला. मात्र हे परिवर्तन घडवून

येत असतांना बाबासाहेबांनी आपल्या हयातीत समाज परिवर्तनाची जी ज्योत पेटविली होती त्यातून देशात 'आंबेडकरवाद' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका वैचारिक वारशाचा जन्म झाला. या वैचारिक वारसाची वाहक म्हणून दलित चळवळ उदयास आली. या ६० वर्षातील दलित चळवळीत अनेक स्थित्यंतरे झाली.

वास्तविकता अशी आहे की, परिवर्तनवादी चळवळीचे मूल्यमापन करण्यासाठी ६० वर्षाचा कालावधी पर्याप्त ठरू शकतो; हेच गृहित स्वीकारून प्रस्तुत लेखात दलित चळवळीचे यशापयश अधोरेखीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जाती व्यवस्थेच्या अंतासाठी सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन व दलित समाज एक राजकीय जमात व्हावी यासाठी केलेल्या पर्यायाची राजकीय संघटनेचा विचार केंद्रस्थानी ठेवून एक स्वतंत्र विचार दिला होता. हा वारसा चालविण्याची जबाबदारी आपल्या अनुयायावर टाकली होती. तेव्हा या पार्श्वभूमीवर आंबेडकरवादाचे पर्यायाने दलित चळवळीचे मूल्यमापन करणे क्रमप्राप्त ठरते.

दलित चळवळीचे विश्लेषण करण्यापूर्वी काही प्रश्न उपस्थित करून त्यांच्या उत्तरार्थ मांडणी करत आपल्याला निष्कर्षापर्यंत जाता येईल. बहुजन समाज एक राजकीय जमात व्हावी; यामागे कोणता अर्थ अभिप्रेत होता? आंबेडकरांचा ध्येयवाद काय होता? सद्य:स्थितीत दलित चळवळ कोणत्या वळणावर आहे? याचा वेध घ्यावा लागेल. गेल्या ६० वर्षातील चळवळीचे चढ-उतार शोधत तसेच बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चिकित्सा करावी लागेल. दलित समाजाचे प्रबळ व पर्यायी राजकीय संघटन असावे आणि धम्मचक्र परिवर्तनातून एक आधुनिक समताधिष्ठित समाजाची उभारणी करून सामाजिक लोकशाहीचा मार्ग प्रस्तुत व्हावा ही त्यांची इच्छा कितपत साकार झाली, याची चिकित्सा करावी लागेल.

डॉ. आंबेडकरांनंतर त्यांच्या तोलामोलाचा नव्हेच पण किमान त्यांचा वारसा वैचारिक व सामाजिक कृतीच्या क्षेत्रात निष्ठेने चालवू शकेल असा नेता समाजाला लाभला नाही. दलित चळवळ ही केवळ संख्येच्या प्रमाणात राजकीय सत्तेचा वाटा मिळविण्याची सत्ताकांक्षी चळवळ होता कामा नये, तर धार्मिक-सामाजिक-राजकीय आर्थिक वगैरे सर्व क्षेत्रांना गवसणी घालणारी सर्वंकष चळवळ व्हावी. स्वावलंबन व स्वाभिमान यांच्याबाबत तडजोड न करता दलितांनी 'राज्यकर्ती जमात' व्हावे

या आंबेडकरांच्या अपेक्षा आजतागायत पूर्ण होवू शकल्या नाही. काँग्रेस पक्षाला प्रबळ पर्याय ठरू शकेल असा एखादा राजकीय पक्ष असावा हा विचार त्यांच्या मनात आयुष्याच्या शेवटी सतत घोळत होता.

कामठी येथे दि. ७ आणि ८ मे १९३२ ला अखिल भारतीय दलित काँग्रेसचे आयोजन करण्यात आले होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सूत्रे येणे फारच आवश्यक आहे. याकरिता सर्व लोकांनी संघटित होवून आपला राजकीय दर्जा संपादन केला पाहिजे. जोपर्यंत ह्या देशाच्या राजकीय नियंत्रणावर अस्पृश्य लोकांचा ताबा चालू शकत नाही तोपर्यंत अस्पृश्यता जाणार नाही.''[१] यातून राजकीय जमात व्हावे याचा अर्थ अभिप्रेत होतो तसेच राजकीय सत्तेचा उपयोग सामाजिक परिवर्तनासाठी होऊ शकतो असे त्यांना वाटते

मद्रास इलाखा शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या विद्यमाने दि. २४ सप्टेबर १९४४ मध्ये आयोजित जाहीर सभेत बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले की, ''शासनकर्ते जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा आहे. हे तुमच्या मनात ठसू द्या. तुमच्या घराच्या भिंतीवर कोरून ठेवा, म्हणजे दररोज तुम्हाला आठवण राहिल. ज्या आकांक्षा आपण उराशी बाळगून आहोत, ज्याच्यासाठी आम्ही लढत आहोत ते काही लहान सहान संकुचित ध्येय नाही. थोड्याशा नोकऱ्यासाठी किंवा सवलतींसाठी लढा नाही. आमच्या अंत:करणातील आकांक्षा फारच मोठ्या आहेत. शासनकर्ते जमात बनने हीच ती आकांक्षा होय.''[२] यातून बाबासाहेबांनी अनुयायावर राजकीय जमातीचे व्यापक ध्येय सांगितले. परंतु त्यांच्या मते दलित वर्गीयांनी आपल्यामध्ये व इतर समाजामध्ये एक मोठी भिंत उभी केली आहे. परिस्थिती अशा थराला आली आहे की, अस्पृश्य वर्गातील उमेदवारांना इतर लोक मते देत नाहीत आणि ते स्वत: सुद्धा दुसऱ्या पक्षातील लोकांना मत देत नाही. तेव्हा त्यांनी ज्या लोकांना दलितांच्या गाऱ्हाण्याविषयी सहानूभूती आहे त्यांच्या सहकार्याने एक राजकीय पक्ष स्थापन करावा आणि दुसऱ्या पक्षातील नेत्याबरोबर काम करण्याचा प्रयत्न करावा. मात्र समविचारी दलितेत्तर समाजाचे सक्रीय सहभागातील असावे असे प्रामाणिकपणे वाटत होते. मात्र त्यांच्या नंतर हे घडू शकले नाही. बाबासाहेबांनी आपल्या काळात राजकीय चळवळीला एक जातीय होवू दिले नाही. बाबासाहेबांनी विधानसभेसाठी स्पृश्य समाजांनाही उमेदवाऱ्या दिल्या. पुढे जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा मी स्वतंत्र मतदार संघाची मागणी सोडतो असे त्यांनी जाहीर केले होते. याबाबत त्यांचे प्रतिपादन पुढील प्रमाणे होते. ''आम्ही उद्याचे राज्यकर्ते आहोत तेव्हा या राजकीय व्यवस्थेत आपले वेगळेपण ठेवण्यापेक्षा या व्यवस्थेत सक्रीय सहभागी होऊन नेतृत्व करण्याची संधी आपण काय म्हणून घालवावी.''[३] म्हणजेच याचा अर्थ असा होतो की, रिपब्लीकन पक्ष बहुजनाचा व्हावा अशी बाबासाहेबांची इच्छाशक्ती होती. रिपब्लीकन पक्षाच्या माध्यमातून त्यांनी दलित जनतेला शेवटचे राजकीय हत्यार दिले होते. त्याचा प्रभावीपणे वापर करून समाजामध्ये आर्थिक, सामाजिक जीवनात लोकशाहीच्या आणि अहिंसक मार्गाने परिवर्तन केले जाईल असा त्यांना विश्वास वाटत होता.

मात्र दुर्दैवाने असा राजकीय एकसंघ प्रवाह अस्तित्वात आला नाही. दलितांतील सर्व जाती पोटजाती रिपब्लीकन पक्षात सामील झाल्या नाहीत. सत्तेसाठी राजकारणामुळे दलित नेते गटागटात विखूरले. बाबासाहेबांनंतर जे नेतृत्य उदयाला आले ते केवळ महार समाजातूनच आले. त्यामुळे दलित चळवळ व राजकारण एका जातीच्या हिताभोवती फिरत राहिले आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी काही अंशी कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनाही संघटनात्मक पातळीवर तसेच सत्तेच्या पटलावर स्थिर होण्यास फारसे यश लाभू शकले नाही. रिपब्लीक ऐक्याच्या मर्यादा तसेच काँग्रेस पटलाचे महाराष्ट्रातील राजकारणामुळे रिपब्लीकन पक्षाची वाढ खुंटीत झाली. दादासाहेब गायकवाड यांनी काँग्रेस -रिपब्लीकन युतीने सामाजिक अभिसरण करण्याचा प्रयत्न केला मात्र अपयशी ठरला. यशवंतरावांनी बेरजेचे राजकारण केले मात्र रिपब्लीकन पक्षाच्या वाट्याला कुंठीत अवस्था आली. दादासाहेब गायकवाड यांनी पक्षाची भूमिका मांडत असतांना म्हणाले की, आम्हाला केवळ काँग्रेस पक्षाला पराभूत करावयाचे नाही तर एक पर्यायी पक्ष म्हणून देशाची संसदीय राजकारण करावयाचे आहे. मात्र असे घडले नाही. बाबासाहेबांनी आखून दिलेल्या भूमिकेवरून त्यांना जाता आले नाही.

बाबासाहेबांचा दलित चळवळ याबाबत व त्यासाठीच्या त्यांच्या योजना कोणत्या होत्या. डॉ. बाबासाहेबांनी ज्या सामाजिक राजकीय परिवर्तनाची अपरिहार्यता व्यक्त केली होती ती साध्य करण्यात दलित संघटनांना कितपत यश आले. १९२० ते १९५६ दलित चळवळीचा भरभराटीचा कालखंड होता. अस्पृश्यता निवारण, सत्याग्रहाचे आयोजन, दलितांचे शिक्षण, त्यांचे राजकीय हक्क आणि धर्मांतर अशा सर्वच आघाड्यावर समग्र सामाजिक परिवर्तनाची चळवळ म्हणून ती अग्रेसर होती. आधुनिक समाज निर्मितीची प्रचंड उर्मी या चळवळीत होती. या काळात दलित नेत्या कार्यकर्त्यात समग्र परिवर्तनाची जाणीव तयार झाली होती.

आंबेडकरी चळवळीतून विशेषत: शिक्षण, आरक्षण, राखीव जागा वगैरेच्या परिणाम स्वरूप जो मध्यमवर्ग दलित समाजात कनिष्ठ व वरिष्ठ पातळ्यावर निर्माण झाला त्याच्या आर्थिक समस्या सुटलेल्या असल्या तरी सांस्कृतिक व अस्मितेच्या समस्या अधिक तीव्रतेने जाणवत होत्या. आपली अस्मिता पायदळी तुडवणाऱ्या परंपरांच्या विरोधात तो सर्व ताकदीनिशी विद्रोह करतो. 'अस्मितेच्या शोधाची, परंपरेच्या नकाराची, विषमता विरोधी विद्रोहाची व समता, स्वातंत्र्यवादी मूल्यांच्या पुरस्काराची चळवळ सुशिक्षीत मध्यमवर्गीय दलितांनी साठोत्तर कालखंडात जोमाने चालविली. दलित साहित्य,

दलित नियतकालिके, दलित रंगभूमी, दलित पँथर, मास मुव्हमेंट, दलित मुक्तिसेना हा या चळवळीचीच परोपरींनी झालेली फलश्रुती म्हणावी लागेल.'[४]

मात्र १९७० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात जी स्थित्यांतरे घडून आली त्यातून बाबासाहेबांना अपेक्षित असलेल्या दिशेने चळवळीची वाटचाल न होता सत्ताकरणाच्या राजकारणात दलित चळवळ दिशाहीन झाली. काँग्रेस पक्षाने सोयीचे राजकारण करून दलित चळवळीच्या संघटनात्मक ऐक्याला सतत सुरूंग लावले. चळवळीतील नेत्यांनी आंबेडकरांचा ध्येयवाद समृद्ध करण्याऐवजी सत्तेत वाटा मिळविण्यात धन्यता मानली. त्याचा परिणाम असा झाला की, ध्येयवादी व परिवर्तनवादी विचार मागे पडला. प्रबुद्ध भारत मासिकात सुधीर गव्हाणे यांनी प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात, ''भावनाप्रधान प्रश्नांत चळवळ अडकुन पडल्यामुळे गंभीर तसेच तातडीच्या सामाजिक आर्थिक प्रश्नांना अनुसरून लढे उभारण्याचे प्रामाणिक प्रयत्न झाले नाहीत. वास्तविक पाहता कोणत्याही चळवळीचे सामर्थ्य समस्या प्रधान राजकारणाला प्राधान्य देण्यातूनच प्रभावी होत असते. अहिंसक स्वरूपाची संघर्ष प्रवणता बाबासाहेबांना अभिप्रेत होती मात्र दलित चळवळीने याकडे फारसे गांभीर्याने पाहिले नाही.''[५] म्हणजे १९८० नंतर दलित चळवळीने बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे आवश्यक होते. नवीन पर्यायी विकास निती, पर्यावरण संरक्षण, श्रमिक आदिवासींच्या आर्थिक चळवळी, विकास आंदोलने यापासून ही चळवळ अलिप्त राहिली.

संदर्भ ग्रंथ :

'दलित चळवळ' या शिर्षकांतर्गत दलित चळवळीचे मूल्यमापन केल्यानंतर या निष्कर्षात येता येते की, आंबेडकरांचा वारसा चालविण्यात अनुयायांना अपयश आले आहे. केवळ सत्तेच्या वाटा मिळविण्यासाठी धन्यता मानली. सर्वसमावेशक राजकारण न करता केवळ महार जातीभोवती फिरत राहिले. त्यामुळे राजकीय एकसंघ प्रवाह अस्तित्वात आला नाही. राजकीय आघाड्यावर आंबेडकरवादाचा वैचारिक वारसा समृद्धपणे दलित चळवळीने सांभाळला नाही. दलित चळवळीत एकजातीय नेतृत्वाचीच भरती झाल्यामुळे व्यापक स्वरूपात संघटनात्मक बळ वाढू शकले नाही. विचार सरणी समान मात्र मतभेद आणि फाटाफूट यामध्ये दलित चळवळ अडकून पडली आहे. तेव्हा चळवळीचे राजकीय-सामाजिक-आर्थिक दृष्टीकोनातून पुर्नमांडणी करून चळवळीत सामर्थ्य आणण्याची गरज आहे.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड १८ वा भाग-१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन पृ. २९९
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड १८ वा भाग-२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन पृ.२६७.
३. ॲड. प्रकाश आंबेडकर, बाबासाहेबांनी भूमी सुपीक केलीया, महाराष्ट्र टाईम्स दिवाळी अंक २००७ पृ. १७९,८०
४. (संपादक) प्रा. रमेश पानशे, महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा, योजना महाविद्यालय वांदे (पूर्व) पृ. ६३.
५. डॉ. सुधीर गव्हाणे, प्रबुद्ध भारत विशेषांक, २००१ पृ. ५ व ६.